रात्री पोटात खूप दुखत होतं .वाटलं ..अपचन असेल मात्र रात्रीतून अंग ठणकायला लागलं आणि सनसनून ताप भरला. डोकं जड झालं .😴सकाळचं सगळं वेळापत्रक कोलमडलं .

कसबसं छोटयाला शाळेत पाठवलं . हे ऑफिसला गेले .मोठा अभ्यासाला बसला. परत कणकण वाटायला लागली आणि मी बेड वर लेटले. डोकं खूप दुखत होतं .थर्मामीटर लावला. ताप होताच अंगात .क्रोसिन घेतली. सोबत दोन मोनॅको बिस्किट घेतले . तोंडाची चवच गेली होती. काही खावंसं वाटत नव्हतं. तसेच पडून राहिले.

थोड्या वेळाने ,आईची हालचाल दिसत नाही बघून प्रज्वलने बेडरूमचे दार ठोठावले. 'आई ,तू बरी आहेस ना ' त्याचा आवाज. 'नाही रे ' म्हटल्याबरोबर तो आत आला . 'मम्मी तुला ताप आहे ग' म्हणत अंगावर चादर ओढली.'तुला काही हवयं का❓ ,मी डॉक्टरचा नंबर लावतो ,तू आराम कर .मी करतो सगळं 'म्हणत तो बाहेर गेला.

मी तापाच्या ग्लानीतच होते .एक दीड तासाने जाग आली. रुमच्या बाहेर आले. मशिनचे कपडे वाळत घातले होते , कचरेवाल्याला कचरा दिला होता .बाईने घासलेली भांडी आत घेतली होती. कुकर खोलून डाळीला फोडणी दिली होती. बापरे ! ज्याला मी एखादं काम सांगितलं तर नाही म्हणणारा, आज त्याने स्वतःहून सगळं काही नीट केलं होतं .डोळ्यात टचकन पाणी आलं माझ्या. हे बघुन तो म्हणाला ,"केलं तरी तुझं हे असं, तू अगोदर आराम कर आणि बरी हो .आपण संध्याकाळी डॉक्टरकडे जाऊया.ओजस शाळेतून आला की मी देईल त्याला अन्न गरम करून तू काळजी करू नकोस, तू अगोदर तब्येत बघ तुझी "

खरंय ते रोजचा आईचा दिनक्रम चुकला की मुलंही गडबडतात . कितीही खोडकर असली तरी मुलंच ती ,😊रागावतात ,चिडतात, ऐकत नाहीत मात्र अशा प्रसंगी त्यांच्या प्रेमाची खरी परीक्षा होते अशावेळी ही मुलंच आधार बनतात .

दुपारी भावाचा  टिफिन बॅगेतून काढण्यापासून ते त्याला वाढून देण्यापर्यंत सर्व काही केलं प्रज्वलने. मला प्रमाण विचारून चहा सुद्धा करून दिला .संध्याकाळी बाबा आल्यावर मात्र सर्व सूत्रे बाबांकडे दिली आणि  दोघे भाऊ  गेम खेळत बसले. डॉक्टर कडे जाऊन आल्यावर बघितलं तर, दोघांनी आम्लेट बनवून खाल्ले होते. "काय म्हणाले डॉक्टर" दोघांनी विचारले .'viral fever आहे ' म्हटल्यावर "आता तू rest कर, आम्ही बघतो सगळं " असे त्याचे बाबा बोलले आणि सगळे कामाला लागले.

मी गोळी घेतली अन् कपडे बदलून खोलीत जाऊन पडले .डोके दुखत होते, बोलायला पण होत नव्हतं .थोड्यावेळाने ह्यांनी उठवलं अन् डाळ भात दिला.खायची अजिबात इच्छा नव्हती पण आणखी गोळ्या घ्यायच्या होत्या.त्यामुळे चार घास खाल्ले.घर कसं शांत वाटत होतं.आज दोघांची मस्ती पण चालली नव्हती.मराठी सिरीयल सुरू होती,पण कुणाच्याही कमेंटस नव्हत्या.सगळेच

निःशब्द.🤦‍♀️

घरातील असे चित्र बघून कसंतरीच वाटलं .एका दिवसाच्या तापाने सगळे रूटीन बदलले .Viral fever त्यात fan कमी speed वर त्यामुळे खोलीत मी एकटीच झोपले.गोळीचा प्रभाव असेल,झोप आली. मात्र मध्यरात्री जाग आली.दरदरून घाम सुटला होता .अंग पुसलं,कपडे बदलले.आणि खोलीच्या बाहेर आले.ताप उतरला होता .डोकं पण दुखत नव्हतं .जरा बरं वाटत होतं. टॉयलेट कडून आले .सगळी मंडळी झोपली होती .घड्याळात बघितले ,पहाटेला अवकाश होता. किचनमध्ये आले. ओटा स्वच्छ केला होता.हायसं वाटलं.चहा प्यावासा  वाटत होता.तोंड कडवट झालं होतं.  करू की नको करता करता नुसतीच सोफ्यावर डोके टेकून बसले. झोप तर येत नव्हती डोळे बंद करून बसले .पहाटेलाच प्रज्वलच्या खोलीतून तिघेही बाहेर आलेत. ओजस ही उठला हे बघून आश्चर्य वाटलं, नाही तर उठवल्याशिवाय उठत नाही पठ्ठा!😊 आजची सकाळ वेगळीच

उठत नाही पठ्ठा!😊 आजची सकाळ वेगळीच जाणवली .पटापट न सांगता सगळे कामाला लागले .मनात विचार आला रोजचं आपलं रुटीन ,रुटीन असलं तरी घराला खेळकर ठेवतं." आई तू बरी आहेस ना ? " प्रज्वलचा आवाज आला आणि मी विचारातून बाहेर आले. " हो रे " असं म्हणताच " मग आज नाश्ता काय" , त्याने पटकन विचारलं आणि जाणवलं ,चला आपलं रुटीन सुरु झालं . चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटले . घरातील पाखरांची किलबिल सुरू झाली होती.

_वीणा विजय रणदिवे.